AGPE THE ROYAL GONDWANA RESEARCH JOURNAL
OF HISTORY, SCIENCE, ECONOMIC, POLITICAL AND SOCIAL SCIENCE
ISSN (E): 2583-1348 | A Peer reviewed | Open Accsess & Indexed
Volume 04 | Issue 02 | February 2023 | www.agpegondwanajournal.co.in | Page No. 54-59

# हिंगोली जिल्ह्यातील शासकीय विकास योजना आणि आदिवासी समाज

डॉ. अण्णाजी दयाराम मडावी
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
आदर्श महाविद्यालय हिंगोली – ४३१५१३

~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

**गोषवारा –**

सन १९७५-७६ मध्ये केंद्र सरकारने निर्देश दिल्याप्रमाणे ज्या गावांतील आदिवासींची लोकसंख्या एकूण लोकसंखेच्या ५० टक्याहून अधिक असेल त्या गावांचा समावेश एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामध्ये करण्यात आला. यानुसार महाराष्ट्र राज्यात आदिवासींची लोकसंखेचे वाढते प्रमाण व मोठे कार्यक्षेत्र यानुसार महाराष्ट्र राज्यात एकूण २९ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये हिंगोली जिल्ह्यातील आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी कळमनुरी या तालुक्याच्या ठिकाणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प स्थापन करण्यात आले आहे. या प्रकल्प कार्यालयाची निर्मिती १८ जून २०१२ च्या शासन निर्णयाद्वारे करण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत हिंगोली व परभणी जिल्ह्याचा समावेश असून या जिल्ह्यांत प्रामुख्याने आंध व पारधी या आदिवासी जमातीं दिसून येतात. सन २०११ च्या जनगणनेनुसार हिंगोली जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ११,७७,३४५ एवढी असून त्यामध्ये आदिवासी लोकसंखेचे प्रमाण १,११,९५४ एवढे म्हणजे ९.५ % आहे. हिंगोली जिल्ह्यात आदिवासी समाज विखुरलेल्या स्वरूपात वास्तव्यात असल्याचे दिसून येत असल्याने या जिल्ह्यातील एकही गाव किंवा वाडी / वस्ती आदिवासी म्हणून घोषित नाही. हिंगोली जिल्हा ओटीएसपी मध्ये असल्याने या जिल्ह्यात सामुहिक विकासाच्या योजना राबविण्यात येत नाही तर फक्त वेयक्तीक लाभाच्या योजना राबविल्या जातात. या जिल्ह्यात माडा व मिनीमाडा मध्ये समाविष्ट असणारी एकूण ६९ गावे असून उर्वरित गावे ओटिएसपी क्षेत्रात येतात. या शोध निबंधामध्ये हिंगोली जिल्ह्यात राबविल्या जाणाऱ्या शासकीय योजनांचा अभ्यास व या जिल्ह्यातील आदिवासी समाजाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**बीज संज्ञा** – आदिवासी समाज, हिंगोली जिल्हा, शासकीय योजना, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

**संशोधनाची उद्दिष्टे –**

१ आदिवासी समाजाचा ऐतिहासिक आढावा घेणे

२ हिंगोली जिल्ह्यात कार्यरत असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करणे.

| CORRESPONDING AUTHOR: | RESEARCH ARTICLE |
|---|---|
| **Dr. Annaji D. Madavi**<br>Assistant Professor<br>Department of Economics, Adarsh Mahavidyalaya Hingoli, Maharashtra.<br>Email: drannajimadavi@gmail.com | |
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

३ हिंगोली जिल्ह्यातिल आदिवासी समाजाच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेणे.

४ शासकीय योजनांच्या अंमलबाजवणीमुळे आदिवासी समाजाला झालेला लाभ तपासणे

**संशोधनाची गृहितके –**

१ शासकीय योजनांमुळे हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या आर्थिक स्थितीत बदल होत आहे.

२ हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाचे राहणीमान सुधारत आहे.

३ आदिवासी समाजाच्या आर्थिक शोषणाचे प्रमाण अधिक आहे.

४ आदिवासी समाजावर रूढी व परंपरेचा मोठा प्रभाव आहे.

**संशोधन पद्धती –**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या संदर्भात अभ्यासासाठी आवश्यक ती माहिती प्राथमिक व दुय्यम माहिती संकलन साधनांचा आधार घेऊन गोळा करण्यात आली आहे. प्राथमिक स्वरूपाची माहिती गोळा करण्यासाठी आदिवासी समाजातील व्यक्तीकडून २०० मुलाखत अनुसूची भरून घेण्यात आली. तर दुय्यम स्वरूपाची माहिती गोळा करण्यासाठी विविध ग्रंथ, शासकीय आकडेवारी, शासकीय अहवाल, इंटरनेट, इत्यादि साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**प्रस्तावना –**

भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्वानुसार महाराष्ट्र राज्यातील आदिवासी लोकांची संस्कृति व त्यांची मूल्ये यांचा आदर ठेऊन त्यांना सक्षम बनविणे, आर्थिक हितसंबंध जोपासणे, अन्याय व शोषणापासून संरक्षण करणे यासाठी आदिवासींच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक सुधारणांच्या कार्यक्रमावर भर देण्यात आला आहे. यासाठी महाराष्ट्र राज्यात सन १९८३ मध्ये स्वतंत्र आदिवासी विभागाची निर्मिती करण्यात आली आहे. या विभागांतर्गत आदिवासी समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी विविध विकास योजना राबविण्यात येत आहेत. महाराष्ट्र राज्यात एकूण ४५ आदिवासी जमाती दिसून येतात. सन १९७५-७६ मध्ये केंद्र सरकारने निर्देश दिल्याप्रमाणे ज्या गावांतील आदिवासींची लोकसंख्या एकूण लोकसंखेच्या ५० टक्याहून अधिक असेल त्या गावांचा समावेश एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामध्ये करण्यात आला. सुरवातीला भारत सरकारने मान्यता दिलेले १६ प्रकल्प होते. महाराष्ट्र राज्यात आदिवासींची लोकसंखेचे वाढते प्रमाण व मोठे कार्यक्षेत्र यानुसार महाराष्ट्रा राज्यात एकूण २९ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाची स्थापना करण्यात आली आहे तर एकूण ४३ माडा क्षेत्रे (सुधारित क्षेत्र विकास खंड) आणि २४ मिनीमाडा क्षेत्रे आहेत. हिंगोली जिल्ह्यातील आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी कळमनुरी या तालुक्याच्या ठिकाणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प स्थापन करण्यात आले आहे. या प्रकल्प कार्यालयाची निर्मिती १८ जून २०१२ च्या शासन निर्णयाद्वारे करण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत हिंगोली व परभणी जिल्ह्याचा समावेश असून या जिल्ह्यांत प्रामुख्याने आंध व पारधी या आदिवासी जमातींचा दिसून येतात. सन २०११ च्या जनगणनेनुसार हिंगोली जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ११,७७,३४५ एवढी असून त्यामध्ये आदिवासी लोकसंखेचे प्रमाण १,११,९५४ एवढे म्हणजे ९.५ % आहे. हिंगोली जिल्ह्यात आदिवासी समाज विखुरलेल्या स्वरूपात वास्तव्यात असल्याचे दिसून येत असल्याने या जिल्ह्यातील एकही गाव किंवा वाडी / वस्ती आदिवासी म्हणून घोषित नाही. हिंगोली जिल्हा ओटीएसपी मध्ये असल्याने या जिल्ह्यात सामुहिक विकासाच्या योजना राबविण्यात येत नाहीत तर फक्त वेयक्तीक लाभाच्या योजना राबविल्या जातात. या जिल्ह्यात माडा व मिनीमाडा मध्ये समाविष्ट असणारी एकूण ६९ गावे असून उर्वरित गावे ओटिएसपी क्षेत्रात येतात.

**आदिवासीचा अर्थ –**

आदिवासी कोण आहेत? आदिवासी कोणाला म्हणावे? याबाबाद अनेक विचार विवध ग्रंथात मांडण्यात आलेले दिसून येते. आदिवासी समाजाचे अभ्यासक, विचारवंत इत्यादींनी आदिवासींना विविध नावांनी संबोधले आहे. संयुक्त राष्ट्र संघाने आदिवासींना 'देशज' हा शब्द वापरलेला आहे. काही विचारवंत आदिवासींना वनात राहणारे म्हणून 'वनवासी' हा शब्दप्रयोग केला आहे. भारताच्या राज्यघटनेत टोळी करून राहणारी जमात म्हणून आदिवासींचा 'अनुसूचित जमाती' असा उल्लेख केला आहे. आदिवासीचा त्या त्या ठिकाणाचे मूळ रहिवासी किंवा मूळ निवासी असा अर्थ विचारात घेतला जातो. हिंदीमध्ये 'जनजाती' तर मराठी मध्ये 'आदिवासी' हा शब्दप्रयोग केला जातो.

**महाराष्ट्रातील आदिवासी –**

संपूर्ण भारताच्या कानाकोपऱ्यात आदिवासी समाज वास्तव्यास असल्याचे आढळते. सन २०११ च्या जनगणानेनुसार भारतातील एकूण आदिवासी समाजाची लोकसंख्या १०.४२ कोटी एवढी असून यापैकी १०५.१० लाख आदिवासी समाजाची लोकसंख्या महाराष्ट्र राज्यात वास्तव्यास आहे. सन २०११ च्या जनगणानेनुसार महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येपैकी ९.३५ टक्के लोकसंख्या आदिवासी समाजाची आहे. भारतात आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात महाराष्ट्र राज्याचा दूसरा क्रमांक लागतो. इतर राज्याप्रमानेच महाराष्ट्र राज्यातील आदिवासी हा राना-वनात, डोंगर-पहाडात, दऱ्या-खोऱ्यात व दुर्गम भागात वास्तव्यास असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक लोकसंख्या असलेला जिल्हा नंदुरबार असून या जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ६९.३ टक्के एवढी आहे.

**हिंगोली जिल्हा माहिती –**

परभणी जिल्ह्यातील भाग म्हणून १९६० साली हिंगोली जिल्हा महाराष्ट्र राज्याचा भाग बनला. परभणी जिल्ह्याचे विभाजन करून १ मे १९९९ रोजी हिंगोली, कळमनुरी, सेनगाव, औंढा नागनाथ आणि बसमत या पाच तहसिलींसह हिंगोली जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. हिंगोली जिल्हा महाराष्ट्र राज्यातिल मराठवाड्याच्या उत्तरेस वसलेला आहे. या जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ४,५२६ चौ. की. मी. एवढे असून सन २०११ च्या जनगणानेनुसार एकूण लोकसंख्येचे प्रमाण ११,७७,३५४ एवढे आहे. तर या जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण ६६.८६ टक्के आहे. औंढा-नागनाथ हा हिंगोली जिल्ह्यातील एक गाव व तालुका आहे. भारतातील पवित्र बारा ज्योतिर्लिंगापैकी आद्य ज्योतिर्लिंग मानल्या जाणाऱ्या नागनाथ (नगेश्वर) मंदिरासाठी औंढा हे ठिकाण सुप्रसिद्ध आहे.

**हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी विकास योजना –**

हिंगोली जिल्ह्यातील आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी कळमनुरी या तालुक्याच्या ठिकाणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प स्थापन करण्यात आले आहे. या प्रकल्प कार्यालयाची निर्मिती १८ जून २०१२ च्या शासन निर्णयाद्वारे करण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत आदिवासी विकास विभागाच्या विविध योजनांची अंमलबजावणी केली जाते. त्यापैकी काही योजनांचा आढावा पुढील प्रमाणे घेतलेला आहे.

१ **शैक्षणिक विकासाच्या योजना -** शासकीय आश्रमशाळा समूह योजना, आदिवासी मुला-मुलींकरीता शासकीय वस्तीगृह, नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळेत प्रवेश देणे, पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयं योजना, आदिवासी विद्यार्थ्यांना शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना, व्यवसायिक पाठ्यक्रमांत शिकणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना पूरक निर्वाह भत्ता देणे, शासकीय आश्रम शाळेत कनिष्ठ महाविद्यालय सुरू करणे.

२ **आर्थिक उन्नतीच्या योजना-** कौशल्य विकास कार्यक्रम योजना, केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना (न्यूक्लियस बजेट),

३ **नियोजन योजना-** ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना, वन हक्क अधिनियम २००६

४ **आदिवासी शेतकऱ्यांना २०० टक्के अनुदानावर तेल पंप / वीज पंप पुरवठा -** आदिवासी शेतकऱ्यांना आर्थिक उन्नतीसाठी व ऊर्जेचा वापर करून जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली करण्यासाठी १०० टक्के अनुदानावर ही योजना राबवली जाते तसेच अशा लाभधारकांना १०० टक्के अनुदानावर एच. डी. पी. ई. पाईप पुरवठा केले जाते.

५ **आदिवासी उमेदवारांची सेवायोजन अंतर्गत नाव नोंदणी करणे-** आदिवासी उमेदवारांना शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगार उपलब्ध होईल व रोजगार उपलब्ध झाल्याने त्यांचे उत्पन्नात वाढ होईल तसेच सुशिक्षित बेरोजगारांची गणना करणे शक्य होईल या उद्देशाने ही योजना राबवली जाते.

६ **पारधी पॅकेज योजना-** बहुसंख्य पारधी समाजाच्या लोकांना शेतजमीन नाही घर नाही त्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी पुढील योजना राबवल्या जातात.

घरकुल योजना (ओटीएसपी/ माडा), घरकुल योजना (टीएसपी), पारधी बेरोजगार लाभार्थ्यांना स्वयंरोजगार उपलब्ध होण्यासाठी किराणा दुकानासाठी अर्थसहाय्य देणे.

**आदिवासी समाजाच्या आर्थिक स्थितीचा आढावा** –

हिंगोली जिल्ह्यांमध्ये एकूण हिंगोली, वसमत, औंढा, सेनगाव आणि कळमनुरी हे पाच तालुके आहेत. हिंगोली जिल्ह्यांमध्ये कळमनुरी असा एक तालुका आहे ज्या भौगोलिक प्रदेशात आदिवासींची सर्वाधिक लोकसंख्या आहे. यामुळे संशोधनासाठी प्रातिनिधिक स्तरावर या तालुक्याची अध्ययन समग्र म्हणून निवड केलेली आहे. हिंगोली जिल्ह्यातील एकूण तालुक्याच्या तुलनेमध्ये कळमनुरी तालुका अद्यापही मागे असल्याचे दिसून येते. या तालुक्याचा समावेश आदिवासी योजना क्षेत्रामध्ये होतो. या कारणामुळेच कळमनुरी तालुक्यात आदिवासीसाठी असलेल्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. नमुना पाहणी केलेल्या आदिवासी कुटुंबानि लाभ घेतलेल्या काही निवडक योजनांचे विश्लेषण पुढील तक्त्यात केले आहे.

**तक्ता क्र. १**

**काही निवडक योजनांचे विश्लेषण**

| अ. क्र. | योजनेचे नाव | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | निवासी आश्रम शाळा | १४३ | ७१.५ |
| २ | शिष्यवृत्ती योजना | १५९ | ७९.५ |
| ३ | शासकीय वसतीगृह योजना | १११ | ५५.५ |
| ४ | दशलक्ष विहीर योजना | ४० | २० |
| ५ | विज पंप योजना | २६ | १३ |
| ६ | व्यवसाय प्रशिक्षण केंद्र | १० | ५ |
| ७ | शबरी आदिवासी घरकुल | ६४ | ३२ |
| ८ | **एकूण आधारभूत कुटुंबे** | **२००** | **१००** |

वरील तक्ता क्रमांक १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे असे दिसून येते की नमुना पाहणी केलेल्या एकुण २०० आदिवासी कुटुंबांमध्ये सर्वाधिक १५९ कुटुंबाने शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेतलेला आहे त्यानंतर निवासी आश्रम शाळा योजनेचा लाभ घेतलेल्या कुटुंबाची संख्या १४३ एवढी आहे तर शासकीय वस्तीगृह योजनेचा लाभ घेतलेल्या कुटुंबांची संख्या १११ एवढी आहे. दशलक्ष विहीर योजना, वीज पंप योजना, व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना व शबरी आदिवासी घरकुल योजना या योजनांचा लाभ घेतलेल्या कुटुंबांची संख्या अनुक्रमे ४०, २६, १० व ६४ अशी आहे.

वरील विश्लेषण वरून असे स्पष्ट होते की शैक्षणिक विकास योजनांचा लाभ घेणाऱ्या नमूना पाहणी केलेल्या कुटुंबाची संख्या अधिक प्रमाणात आहे तर इतर आर्थिक विकासाच्या योजनांचा लाभ घेणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण कमी आहे.

अध्ययन क्षेत्रातील आदिवासी समाजामध्ये भूमीहीन कुटुंबाचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे दिसून येते तर ज्यांच्याकडे शेत जमीन आहे त्यांच्याकडे ही पाच एकर पर्यंतच मर्यादित असल्याचे दिसते. आदिवासी समाजामध्ये जिरायती जमिनीचे प्रमाण सर्वात जास्त आहे त्यामुळे अशा शेतीपासून मिळणारे उत्पन्न सुद्धा अनिश्चित स्वरूपाचे असते कारण त्यांना पूर्णतः निसर्गावर अवलंबून राहावे लागते. आदिवासी समाजाची आर्थिक परिस्थिती ही गरिबीची आहे. आदिवासी समाजाकडे शेती व्यवसाय शिवाय उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नाही. आदिवासी समाजातील ज्या शेतकऱ्यांकडे स्वतःची जमीन आहे ती जमीन परंपरागत पद्धतीने करतात त्यामुळे शेतिव्यावसायातून अत्यंत अल्प प्रमाणात उत्पन्न मिळते. नगदी पिके घेण्याचे प्रमाण सुद्धा अत्यंत अल्प असल्याचे दिसून येते. नमूना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी समाजातील कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न नुसार माहिती गोळा केली असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे.

**तक्ता क्र. २**

**सर्वसाधारण वार्षिक उत्तपनाचे विश्लेषण**

| **अ. क्र.** | **वार्षिक उत्तपन्न (रु.)** | **उत्तरदात्यांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | २५,००० पर्यन्त | १०९ | ५४.५ |
| २ | २५.००१ ते ५०,००० | २१ | १०.५ |
| ३ | ५०,००१ ते ७५,००० | ६८ | ३४.० |
| ४ | ७५,००१ ते १,००,००० | २ | १.० |
| ५ | १,००,००१ पेक्षा अधिक | ०० | ०.० |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

वरील तक्ता क्रमांक २ मध्ये नमुना पाहणी केलेल्या आदिवासी कुटुंबाचे सर्वसाधारण वार्षिक उत्पन्नानुसार विश्लेषण केले असता असे दिसून येते की, वार्षिक उत्पन्न गट २५,००० रु. असणाऱ्या उत्तरदादत्यांची संख्या सर्वाधिक म्हणजे १०९ (५४.५%) एवढे आहे. त्यानंतर ५०,००१रु. ते ७५,००० रू. या उत्पन्न गटातील उत्तरदात्यांची संख्या असून ती ६८ म्हणजे ३४ टक्के एवढी आहे. २५,००१ रू. ते ५०,००० रू. या उत्पन्न गटातील उत्तरदात्यांची संख्या २१ एवढी असून त्यांचे प्रमाण १०.५ टक्के एवढे आहे तर सर्वात कमी उत्तरदात्यांची संख्या २ एवढी असून त्यांचा उत्पन्न गट ७५,००१ ते १,००,००० रु. हा आहे. १,००,००१ रू. या उत्पन्न गटातील उत्तरदात्यांची संख्या निरंक आहे.

या विश्लेषणावरून असे स्पष्ट होते की आदिवासी समाजामध्ये पारंपारिक पीक घेण्याचे प्रमाण जास्त असल्याने तसेच कोरडवाहू जमिनीचे प्रमाण जास्त असल्याने त्यांच्याकडील जमिनीपासून पुरेशा प्रमाणात वार्षिक उत्पन्न मिळताना दिसून येत नाही. भूमिहीन व शेतमजुरी करणाऱ्या आदिवासी कुटुंबाचे प्रमाण जास्त दिसून येते. आदिवासी समाजामध्ये उत्पन्न कमी असल्याचे एक कारण म्हणजे आजही आदिवासी समाजामध्ये कृषी व्यवसायात आधुनिक संसाधनाचा मोठ्या प्रमाणात वापर होताना दिसून येत नाही. गरिबीमुळे आदिवासी समाज यांत्रिकी साधने खेरदी करू शकत नाहीत तसेच त्यांना शासनाकडून मिळणाऱ्या कृषी अवजारांचा योग्य फायदाही मिळत नसल्याचे दिसते.

**निष्कर्ष -**

आदिवासी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी शासकीय पातळीवर राबविण्यात येणाऱ्या विविध योजना फार विस्तृत्व व आदिवासींचा सर्वांगीण विकास होईल या दृष्टीने पोषक ठरतील अशा आहेत परंतु त्यांच्या अंमलबजावणीमध्ये असलेल्या उनिवा दूर करणे फार गरजेचे आहे. नमुना पाहणी केलेल्या बहुतांश आदिवासी समाजातील कुटुंबांना शासकीय योजनांची प्रत्यक्ष माहिती व अनुभव नसल्याचे आढळून आले. शिष्यवृत्ती व वस्तीगृह यासारख्या शैक्षणिक

सवलतींची काही प्रमाणात माहिती असल्याचे दिसून येते. शासकीय योजनांचा लाभ घेताना आदिवासी कुटुंबांना अनेक समस्यांशी सामना करावा लागत असल्याचे दिसते त्यामध्ये कागदपत्रांचे संकलन ही महत्त्वाची समस्या भेडसावते. शासकीय योजनांच्या अंमलबजावणीमुळे आदिवासी समाजातील मुलांचा व त्यांच्या पालकांचा शिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात सकारात्मक बदल होत असल्याचे दिसते. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही आदिवासी समाजाचा समाधानकारक विकास झाल्याचे दिसून येत नाही ही फार खेदाची बाब आहे. आदिवासी समाजाला शिक्षणाचे महत्त्व अजूनही काढलेले नाही. आदिवासी समाजात शिक्षणाची आवड निर्माण करणे फार गरजेचे आहे. या समाजात शिक्षणाचे प्रमाण वाढल्यास आदिवासींच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ घेणे शक्य होईल.

**आभार (Acknowledgement) -** प्रस्तुत संशोधनकार्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्याकडून 'लघु शोध प्रकल्प २०२०-२१' अंतर्गत मान्यता देण्यात आली आहे व प्रस्तुत संशोधन साठी अर्थसहाय्य केले आहे त्याबद्दल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा आभारी आहे.

**संदर्भ –**

१ गुरुनाथ नाडगोंडे – 'भारतीय आदिवासी' कॉनटिनेन्टल प्रकाशन, पुणे, (२००२).
२ डॉ. शौनक कुलकर्णी – 'महाराष्ट्रातील आदिवासी' डायमंड पब्लीकेशन, पुणे, (२००९).
३ डॉ. प्रदीप आगलावे – 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, (२०१२).
४ डॉ. सौ. शैलजा देवगावकर, डॉ. एस. जी. देवगावकर – 'आदिवासी विश्व' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर. (२०१५).
५ डॉ. एस. जी. देवगावकर – 'आदिवासी विकास प्रशासन' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, (२०१६).
६ Dayaram, Madavi Annaji. "Gadchiroli Zilhyatil Adiwasi Samajachya Madiya Gond Samajik va Arthic Sthitiche Adhayan." http://hdl.handle.net/10603/279583
७ विभागाच्या योजनांची माहिती पुस्तिका सन २०१९-२०, महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग मंत्रालय, मुंबई, माहिती पुस्तिका.pdf.pdf (maharashtra.gov.in)
८ डॉ. अण्णाजी मडावी - 'आदिवासी समाजासाठी असलेल्या शासकीय योजनांचा एक अभ्यास: विशेष संदर्भ कळमनुरी तालुका' Mukt Shabd Journal, volume – 11, ISSUE IX, 2022.
९ https://mahades.maharashtra.gov.in/files/report/PCA_2011_ALL.pdf
१० **https://itdpkalamnuri.co.in/**
११ **https://hingoli.nic.in/mr/**
१२ **http://hdl.handle.net/10603/242818**

■ ■ ■